फौजदारी किरकोळ अर्ज नं. – १३७/२०१८

## आदेश नि. २९ वरील

१. सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज म्हणण्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. सामनेवालाचे कथन की, अर्जदार हिने नि. १ चा अर्ज दाखल करुन पोटगीची मागणी केली आहे. सामनेवाला यांनी म्हणणे देवून अर्जदार ही सौदी अरेबिया मध्ये नोकरी करत होती व तिला सामनेवाला पेक्षा जास्त पगार होता अशा तक्रारी केल्या आहेत. अर्जदार हिचा उलटतपास घेताना त्यांच्यामधील तलाकच्या अनुषंगाने त्यांच्या समाजात तिने तक्रारी केल्या होत्या असे कथन केले. त्या अनुशंगाने सामनेवाला यांनी गावचे संस्थेकडे चौकशी केली तेव्हा अर्जदार व तिचे वडिल बहाउद्दीन तिसेकर यांनी मौजे तिसे, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील "जुम्मा मस्जीद" तिसे या संस्थेकडे अर्जदार व सामनेवाला यांच्या तलाकाबाबत तक्रारी केल्या होत्या व त्यात सामनेवाला याने तिला भारतात आणल्यामुळे तिला सौदी येथील नोकरीचा ही त्याग करावा लागला असे कथन केले आहे. या संदर्भात सदर संस्थेच्या मिनिटस् मध्ये ही त्याचा उल्लेख आहे व सहया आहेत. यावरुन अर्जदार हिने ती सौदीत नोकरी करत होती हे मान्य केल्याचे दिसले त्या अनुषंगाने म्हणणे मधील परिच्छेद नं. ४अ नंतर ४ ब " अर्जदार ही तीचे वडीलांचे आजारपणाचा बहाण करुन भारतात आल्यावर तीने व तीचे वडील श्री. बहाऊद्दीन इब्राहिम तीसेकर जे तिसे गावात मुस्लीम समाजाची जुम्मा मसजीद तिसे नावाच्या संस्थेचे कमिटी सभासद आहेत त्यांनी सामनेवाला याने अर्जदारास तलाक न देता तीच्या झालेल्या चुका दुरुस्त करण्याची एकवार संधी द्यावी, सामनेवाला याने तीचे पोटात मुल असताना सुट्टीवर भारतात आणून सोडले व पुन्हा नेणेस नकार दिला, माझी फसवणूक झाली आहे या कारणास्तव तीला सौदीतील नोकरीचा ही त्याग करावा लागला. अशा आशयाच्या तक्रारी केल्या होत्या. त्यावेळी सामनेवाला व त्याचे आई वडील परदेशी होते. गावातील वरील संस्था ही गावातील मुस्लीम समाजातील लोकांची गा–हाणी ऐकून ती समाजाच्या पातळीवर सोडवणेचा प्रयत्न करीत असते. ज्या व्यक्ती अशी आपली गा–हाणी मांडतात त्यांना सदर समजाचे संस्थेचे मिटींगमध्ये त्यांची गा–हाणी मांडणेची संधी

दिली जाते व त्यावर तोडगा काढणेचा प्रयत्न केला जातो व त्याबाबत मिटींगमध्ये होणा–या गोष्टींचे अहवाल (मिनीट्स) लिहीले जातात. त्याचप्रकारे अर्जदार व तीचे वडिलांनी वरील आशयाचे गा–हाणे सदर संस्थेपुढे मांडले होते. त्याबाबत दि. १०/०३/२०१८ रोजी मिटींग झाली त्यामध्ये अर्जदार व तीचे वडिलांनी वरीलप्रकारे त्यांचे गा–हाणे मांडले होते व त्याबाबत त्या दिवशी मिनीट्स देखील लिहिणेत आली होती. त्या मिटींगमध्ये अर्जदारचे वडीलही हजर होते. त्याबाबत त्यांची कमिटी मेंबर म्हणून सहीही त्या मिनीट्सवर घेतली गेली आहे. अशाप्रकारे दि. १०/०३/२०१८ रोजी अर्जदार व तीचे वडीलांनी सदर संस्थेचे कमिटी मिटींगमध्ये ती सौदीला नोकरी करीत होती व तीचा तीला त्याग करावा लागला ही बाब मान्य केली आहे. " अशी दुरुस्ती समाविष्ट करुन अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी सामनेवालाची विनंती आहे.

३. अर्जदार याने नि. ३३ येथे म्हणणे देवून अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारली. अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. सामनेवाला यांनी प्रस्तूतचा अर्ज विलंब व्हावा या कारणानेच दाखल केला आहे. दि मुस्लीम वुमेन प्रोटेक्शन ऑफ राईटस् ऑन डिव्होर्स ॲक्ट १९८६ कलम ३ उपकलम ३ ब पहाता अशा प्रकारचे अर्ज एक महिन्यात निकाली करणे आवश्यक आहे. या कायदयाखाली केली जाणारी प्रकरणे संक्षिप्त प्रकारची असतात. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, प्रस्तुतची दुरुस्ती मंजूर केल्यास सामनेवाला यांना नविन बचाव घेण्यास संधी दिल्यासारखी होणार आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराचा पुरावा संपलेला आहे. सामनेवाला यांच्या पुराव्यासाठी प्रकरण असताना प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही तो नामंजूर करावा.

५. मी सामनेवाला तर्फे सन्मानिय विधीज्ञ श्री. के. पी. दामले व अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. शेठ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष व त्याची कारणे नमुद केली आहेत ती खालीलप्रमाणे,

| अनु.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सामनेवाला मागणीप्रमाणे म्हणणे दुरुस्त करु मिळणेस पात्र आहे का ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**प्रश्न क्र. १ व २ करीता –**

६. मी सामनेवाला यांनी दाखल केलेले म्हणणे नि. १६ चे अवलोकन केले. त्यामध्ये परिच्छेद नं. ३ येथे लग्नापूर्वी अर्जदार ही मोरवंडे येथे लेक्चरर म्हणून नोकरीला होती. तिला रु. २० ते २५ हजार दरमहा पगार होता, लग्नानंतर सौदी अरेबिया येथे दि रियाद किंग साऊथ युनिव्हर्सिटी मध्ये आय टी ट्रेनर म्हणून ती नोकरी करु लागली व तिला दमहा रु. १,००,०००/– पगार होता असे कथन केले आहे. सामनेवाला यांनी या अर्जाव्दारे अर्जदार हिने त्यांच्या समाजाकडे केलेल्या तक्रारीमध्ये तिने तलाक मुळे तिला सौदीतील नोकरी सोडून यावे लागले असे कथन केले आहे. त्या अनुषंगाने सामनेवाला म्हणण्यात दुरुस्ती करु पाहत आहे. सदरची दुरुस्ती ही सामनेवाला यांच्या म्हणणे नि. १६ परिच्छेद नं. ३ मधील कथनांच्या अनुषंगाने आहे. ती मंजूर केल्यास सामनेवाला याच्या बचावात कोणताही अमुलाग्र बदल होणार नाही. त्यामुळे न्यायाच्या व हिताच्या दुष्टीने अर्ज मंजूर होणेस पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी आले आहे. म्हणून मी प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून प्रश्न क्र. २ चे उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांनी सदरची दुरुस्ती तत्काळ करुन दुरुस्त म्हणण्याची प्रत अभिलेखावर दाखल करावयाची आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

(श्रीम. प्र. प्र. खापे)

दि. ०१/०२/२०२०

न्यायदंडाधिकारी वर्ग –१, खेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | : | A. A. Chavan |
| Court Name | : | Civil Judge (J.D.) & J.M.F.C. Khed. |
| Date of Decision | : | 01/02/2020 |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 01/02/2020 |
| Order uploaded on | : | 01/02/2020 |